# जनसंपर्क विभाग

जळगाव दि. २१ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात उद्या शनिवार दि. २२ जुलै रोजी G-20 युवा संवाद भारत@2047 संमेलन होणार आहे. या संमेलनाची तयारी पूर्ण झाली आहे.

भारत सरकारचे युवक व क्रीडा मंत्रालय आणि राष्ट्रीय सेवा योजना कक्ष, उच्च व तंत्रशिक्षण विभाग महाराष्ट्र शासन यांनी जारी केलेल्या मार्गदर्शक तत्त्वानुसार हा कार्यक्रम होणार आहे. विद्यापीठाशी संलग्न असलेल्या तिनही जिल्ह्यातील संलग्न महाविद्यालयातील १५०० विद्यार्थी या संमेलनात सहभागी होणार आहेत.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गतवर्षी १५ ऑगस्ट रोजी केलेल्या भाषणात देशातील नागरिकांना पंचप्रण (संकल्प) दिले आहेत. त्यामध्ये विकसित भारताचे ध्येय, गुलामगिरी किंवा वसाहतवादी मानसिकतेची चिन्हे काढून टाकणे, तेजस्वी वारशाचा अभिमान बाळगणे, एकतेचे सामर्थ्य आणि नागरिकांमध्ये कर्तव्याची भावना रूजविणे यांचा समावेश आहे. या संमेलनात २५ निवडक विद्यार्थ्यांना अमृत काळातील पंचप्रण यावर सादरीकरणाची संधी मिळणार आहे.

उद्या शनिवार दि. २२ रोजी सकाळी ९.३० वाजता ग्रामविकास मंत्री श्री. गिरीष महाजन यांच्या हस्ते उद्घाटन होणार असून कुलगुरू प्रा. व्ही.एल. माहेश्वरी हे अध्यक्षस्थानी असतील तर खा. रक्षा खडसे व आ. मंगेश चव्हाण हे प्रमुख पाहुणे असणार आहेत. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे सल्लागार समिती सदस्य राजेश पांडे यांचे बीजभाषण होणार आहे. यावेळी प्र-कुलगुरू प्रा. एस.टी.इंगळे, व्यवस्थापन परिषद सदस्य राजेंद्र नन्नवरे, रा.से.यो. चे क्षेत्रीय संचालक डी. कार्तिकीयेन, राज्य संपर्क अधिकारी डॉ. रामेश्वर कोठावळे यांची विशेष उपस्थिती राहणार आहे. दुपारी विद्यार्थ्यांचे सादरीकरण होईल. केशवस्मृती सेवा संस्थेचे अध्यक्ष भरत अमळकर या सत्राच्या अध्यक्षस्थानी असतील. संध्याकाळी ४.०० वाजता पाणीपुरवठा मंत्री तथा पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या उपस्थितीत व कुलगुरू प्रा.व्ही.एल. माहेश्वरी यांच्या अध्यक्षतेखाली समारोप होणार आहे. यावेळी खा. उन्मेष पाटील, प्र-कुलगुरू प्रा. एस.टी.इंगळे यांची यावेळी उपस्थिती असेल. या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन कुलसचिव डॉ. विनोद पाटील, समन्वयक अॅड अमोल पाटील, रा.से.यो. चे संचालक डॉ. सचिन नांद्रे, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. जे.डी. लेकुरवाळे यांनी केले आहे.

---

जा.क्र.: कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२३ दिनांक: २१ जुलै, २०२३

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी